# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
# Date – 07 February 2025
# Time 18.10 to 18.20
# Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – ०८ फेब्रुवारी २०२५ सायंकाळी ६.१०**

****

- गडचिरोलीला केंद्रस्थानी ठेऊन देशातली सर्वात मोठी औद्योगिक इकोसिस्टीम विदर्भात तयार होत असल्याचं मुख्यमंत्र्यांचं प्रतिपादन
- राज्यातल्या वाढीव मतदारसंख्या प्रकरणी महाविकास आघाडीची निवडणूक आयोगाकडे चौकशीची मागणी
- तीन दिवसीय वैदिक संमेलनाला रत्नागिरीत प्रारंभ

आणि

- छत्रपती संभाजीनगर इथल्या अजिंठा नागरी सहकारी बँक घोटाळ्याप्रकरणी बँकेचे अध्यक्ष माजी आमदार सुभाष झांबड यांना अटक

****

देशातली सर्वात मोठी औद्योगिक इकोसिस्टीम विदर्भात गडचिरोलीला केंद्रस्थानी ठेऊन तयार होत असल्याचं प्रतिपादन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे. नागपूर इथं आज 'ॲडव्हान्टेज विदर्भ २०२५' या औद्योगिक महोत्सवात ते बोलत होते. गडचिरोलीमध्ये होऊ घातलेल्या लोह क्रांतीमुळे नजीकच्या सर्व जिल्ह्यांना लाभ होईल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केला. वर्धन लिथियमच्या ४२ हजार कोटींच्या सामंजस्य करारामुळे विदर्भात एक पथदर्शी इकोसिस्टीम तयार होत आहे.

दरम्यान, गडचिरोली इथलं लोहखनिज देशातील उच्च दर्जाचं असून त्यावर प्रक्रिया उद्योग येत आहेत, येत्या पाच वर्षात देशातील स्टील हब म्हणून उदयास येईल, अशी आशा केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केली आहे. राष्ट्रसंत तुकडोजी

महाराज नागपूर विद्यापीठ परिसरात झालेल्या या कार्यक्रमास अनेक मंत्री, उद्योग समुहाचे प्रतिनिधी आणि अधिकारी उपस्थित होते.

****

राज्यातल्या विधानसभा निवडणुकीत मतदारसंख्या वाढल्याप्रकरणाची चौकशी करावी, अशी मागणी महाविकास आघाडीनं निवडणूक आयोगाकडे केली आहे. लोकसभेतले विरोधी पक्ष नेते राहुल गांधी, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी आज नवी दिल्लीत घेतलेल्या संयुक्त पत्रकार परिषदेत ही मागणी केली. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांदरम्यान मतदारसंख्या ३९ लाखांनी कशी वाढली असा प्रश्न गांधी यांनी उपस्थित केला. आपल्याला या मतदार यादीबाबत माहिती देण्याची मागणी गांधी यांनी केली, ते म्हणाले –

***हमने इलेक्शन कमिशन को पांच बार बोला है, की हम आरोप नही लगा रहे है। हम आपसे सिर्फ महाराष्ट्र की वोटर्स लिस्ट मांग रहे है। लोकसभा की फाईनल वोटर लिस्ट। नेम, अॅड्रेस, फोटोग्राफ। विधानसभा की फायनल वोटर लिस्ट। नेम, अॅड्रेस, फोटोग्राफ। तीनों राजनईक पार्टीयां, विपक्ष की पार्टींयां महाराष्ट्र की पब्लिकली आपसे सवाल पूछ रही है। मैने पार्लमेंट मे बोला, हमारे सब नेतोओं ने बोला इलेक्शन कमिशन हमे लिस्ट नही दे रही। उनकी जिम्मेदारी बनती है, की जल्दी से जल्दी लोकसभा, विधानसभा महाराष्ट्र की लिस्ट वो एन सी पी, शिवसेना अँड काँग्रेस पार्टी को पकडा दे। क्यों की हम इस इन्वेस्टीगेशन को एंड तक ले जाना चाहते है।***

दरम्यान, काँग्रेसला दिल्ली निवडणुकीत पराभवाची भीती वाटत असल्यानं राहुल गांधी विनाकारण असे प्रश्न उपस्थित करत आहेत, अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. राहुल गांधी यांनी पराभवाबद्दल आत्मचिंतन करावं, असा सल्ला फडणवीस यांनी दिला.

***पहिले तर याचं सगळं उत्तर हे इलेक्शन कमिशन ने दिलेलं आहे. किती मतदार वाढले, ते कुठे वाढले, ते कसे वाढले इलेक्शन कमिशन ने सांगितलेलं आहे.आता ही जी काही तयारी राहुल गांधींची चालली आहे, ती दिल्लीमध्ये प्रचंड मोठा पराभव त्यांचा होणार असल्यामुळे जो***

***पर्यंत ते आत्मचिंतन करणार नाहीत आणि आपल्या मनाची खोटी समजूत काढून घेतील, तोपर्यंत जनतेचं समर्थन त्यांना कधीच मिळणार नाही.***

दरम्यान, गांधी यांनी विचारलेल्या सर्व प्रश्नांची तपशीलवार लेखी उत्तरं दिली जातील, असं निवडणूक आयोगानं म्हटलं आहे. लोकशाहीत राजकीय पक्ष हा महत्त्वाचा घटक असून त्यांच्या प्रश्नांना उत्तरं देणं तसंच त्यांची मतं आणि सूचना ऐकून घेतल्या पाहिजेत असं आयोगानं सामाजिक संपर्क माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.

****

लोकसभेत आज अर्थसंकल्पावर चर्चा झाली. काँग्रेसचे धर्मवीर गांधी, समाजवादी पार्टीचे शिवपालसिंह यादव, तृणमूक काँग्रेसचे अभिषेक बॅनर्जी आदी खासदारांनी अर्थसंकल्पावर टीका केली, तर भाजपचे राव राजेंद्रसिंह यांच्यासह इतर सदस्यांनी अर्थसंकल्पातल्या तरतुदींचं स्वागत केलं.

****

देशात माता मृत्यू दरात ८३ टक्क्यांनी घट झाली आहे. आरोग्य आणि कुटुंब कल्याणमंत्री जे पी नड्डा यांनी आज लोकसभेत एका प्रश्नाच्या लेखी उत्तरात ही माहिती दिली. सरकारकडून राबवल्या जात असलेल्या विविध उपाययोजनांचं हे फलित असल्याचं नड्डा म्हणाले. बालमृत्यूदरातही ६९ टक्के घट झाल्याचं नड्डा यांनी सांगितलं. जागतिक पातळीवर माता आणि बाल मृत्यूदरात अनुक्रमे ४२ टक्के आणि ५५ टक्के घट झाल्याकडे नड्डा यांनी लक्ष वेधलं.

****

देश हरित ऊर्जेच्या क्षेत्रात जगाला एक नवीन मार्ग दाखवत आहे, असं प्रतिपादन नवीकरण आणि अक्षय ऊर्जा मंत्री प्रल्हाद जोशी यांनी केलं आहे. देशाने नुकतीच शंभर गिगावॅट सौरऊर्जा क्षमता ओलांडून एक ऐतिहासिक टप्पा गाठला आहे. त्या पार्श्वभूमीवर जोशी यांनी ही प्रतिक्रिया दिली. २०३० पर्यंत ५०० गिगावॅट बिगर-जीवाश्म इंधनावर आधारित ऊर्जा क्षमतेचं महत्त्वकांक्षी लक्ष्य साध्य करण्याच्या दिशेने हे एक महत्त्वाचं पाऊल आहे, असं नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयाने म्हटलं आहे.

****

प्रयागराज इथं सुरू असलेल्या महाकुंभमेळ्यात आतापर्यंत ४० कोटी भाविकांनी स्नान केलं आहे. १३ जानेवारीपासून सुरू झालेल्यस या महाकुंभमेळ्यात आतापर्यंत मकरसंक्रांत, मौनी अमावस्या आणि वसंत पंचमी या तीन पर्वण्यांवर जगभरातून आलेल्या भाविकांनी अमृत स्नान केलं, कुंभमेळा अजून १९ दिवस चालणार असून, भाविकांची ही संख्या ५० कोटींहून अधिक होऊ शकते, असा अंदाज उत्तरप्रदेश सरकारकडून वर्तवण्यात आला आहे. दरम्यान, येत्या सोमवारी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू त्रिवेणी संगमावर धार्मिक अनुष्ठानात सहभागी होण्याची शक्यता या वृत्तात वर्तवण्यात आली आहे.

****

दक्षिण काशी अशी ओळख असलेल्या पैठण इथं आज गोदावरी प्रगट दिनानिमित्त जलपूजन करण्यात आलं. पैठण इथल्या कृष्णकमल तीर्थावर भक्तांच्या मांदियाळीत हा सोहळा पार पडला. गोदावरी नदीमध्ये पुष्पवृष्टी करून महाआरतीने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

****

संस्कृत ही भारताची पुरातन भाषा आहे, तिच्या संवर्धनासाठी प्रयत्न केले जात असल्याचं, रत्नागिरीचे जिल्हा पोलीस अधीक्षक धनंजय कुलकर्णी यांनी म्हटलं आहे. रत्नागिरीत इथं आज तीन दिवसांच्या क्षेत्रीय वैदिक संमेलनाच्या उद्घाटन कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. आधुनिक काळातल्या ताणतणावाच्या जीवनात स्वास्थ्य मिळवण्यासाठी संस्कृत वाचन आणि पठणातून काही उपाययोजना करता येते का, यावर संशोधन व्हायला हवं, अशी अपेक्षा कुलकर्णी यांनी केली.

दरम्यान, या उद्घाटन सोहळ्यापूर्वी शहरातून शोभायात्रा काढण्यात आली. विविध वेशभुषेतले नागरिक मोठ्या संख्येनं या शोभायात्रेत सहभागी झाले होते.

****

छत्रपती संभाजीनगर इथल्या अजिंठा नागरी सहकारी बँकेच्या ठेवीदारांच्या ९७ कोटी ४१ लाख रुपयांच्या गैरव्यवहारप्रकरणी काँग्रेसचे माजी विधान परिषद सदस्य आणि बँकेचे अध्यक्ष सुभाष झांबड यांना पोलिसांनी आज छत्रपती संभाजीनगर इथं अटक केली. झांबड यांच्यावर वर्षभरापूर्वी या प्रकरणी गुन्हा दाखल झाला होता, तेव्हापासून झांबड फरार होते. या प्रकरणी बँकेचे मुख्याधिकारी प्रदीप कुलकर्णी यांच्यावरही गुन्हा दाखल झाला होता. आज सकाळी अटक झाल्यानंतर झांबड

यांना आजच न्यायालयासमोर हजर करण्यात येत असल्याचं, याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

परभणीच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयामध्ये प्रथमच आज देहदानाची नोंद झाली. शहरातील एका नागरीकाने आपल्या भावाच्या निधनानंतर त्यांचा देह महाराष्ट्र ॲनाटोमी ऍक्ट अंतर्गत शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाला दान केला. वैद्यकीय महाविद्यालयात शरीररचनाशास्त्र विभागातल्या विद्यार्थांना शिक्षणासाठी दानात मिळालेल्या या मृतदेहांचा उपयोग होतो. परभणी जिल्ह्यात देहदानासंदर्भात जनजागृती सुरू असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

जालना जिल्ह्यातल्या शिधापत्रिका धारकांनी स्वस्त धान्याचा लाभ कायम रहावा यासाठी ई-केवायसी आणि मोबाईल सिडींग करुन घ्यावं, असं आवाहन जिल्हा पुरवठा अधिकारी सविता चौधर यांनी केलं आहे. जिल्ह्यातल्या पाच लाख ६५ हजार लाभार्थ्यांची ई-केवायसी प्रलंबित असून, ई केवायसी पूर्ण करून घेण्यासाठी गावनिहाय शिबीरं घेण्यात येत आहे. शिधापत्रिका धारकांनी या शिबिराचा लाभ घ्याव, असंही चौधर यांनी सांगितलं.

****

नांदेड जिल्ह्यात १० फेब्रुवारीपासून हत्तीरोग दुरीकरण सार्वत्रिक औषधोपचार मोहीम सुरू केली जाणार आहे. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख यांनी ही माहिती दिली. जिल्ह्यातल्या दहा तालुक्यात ही मोहीम प्रभावीपणे राबवण्यासाठी जिल्हा स्तरावरून योग्य ते नियोजन करण्यात आलं असल्याची माहितीही देशमुख यांनी दिली.

****

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक परीक्षा मंडळाच्या १२वीच्या परीक्षा ११ फेब्रुवारीपासून सुरू होत आहेत. यंदा छत्रपती संभाजीनगर विभागातून परभणी, हिंगोली, बीड, छत्रपती संभाजीनगर, आणि जालना या चार जिल्ह्यातून १ हजार ४०८ महाविद्यालयातले एक लाख ८५ हजार ३०० विद्यार्थी १२वीची परीक्षा देणार आहेत. यासाठी मंडळाकडून मोठ्या प्रमाणात नियोजन करण्यात आलं असून, ४६० परीक्षा केंद्रं निश्चित करण्यात आली आहेत.

****